CNR No. MHRG120004532022

नियमीत दिवाणी दावा क्र. २७/२०२२
शोभा वि. ग्रामस्थ सर्वे तर्फे पंचकमिटी

## निशाणी क्र. ३० कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० (२) नुसार तिला दावामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करुन लेखी म्हणणे व कैफियत सादर करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूतचा दावा ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल करण्यात आला असून दावा मिळकतीच्या ७/१२ उता-यावर तिचा पती नरेंद्र उमराव पेंटर यांचे नाव दाखल आहे. वादीस प्रस्तूतचा दावा नरेंद्र उमराव पेंटर यांची पत्नी म्हणून दाखल करण्याचा अधिकार नाही. तिने तलाठयाकडे स्वतःच्या नावाची नोंद घेण्याकरीता अर्ज दाखल केला असून सदरचे प्रकरण प्रलंबित आहे. दावा मिळकत तिच्या ताबेकब्जे वहिवाटी आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल गुण अवगुणावर लागण्यासाठी आणि अनेक दावे दाखल होवू नये म्हणून अर्जदार हिने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

२. वादीने निशाणी क्र.३४ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार ही तोतया व्यक्ती असून तिने या आधी सुध्दा वादीच्या लाभात ना. उच्च न्यायालय यांच्याद्वारे पिटीशन नं.२५१/२०१६ मध्ये देण्यात आलेले लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन रद्द होण्याकरीता किरकोळ पिटीशन नं.२४/२०१७ दाखल केले होते. सदरचे पिटीशन ना. उच्च न्यायालय मुंबई यांनी ५०,०००/- रुपये खर्चासह अर्जदार हिच्या विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० नुसार कारवाई करण्याचे निर्देश देवून फेटाळले आहे. त्यानंतर अर्जदार हिने ना. उच्च न्यायालय यांच्या डिव्हीजन बॅन्चकडे दाखल केलेले अपील नं.४३८/२०१७ आणि ना. सर्वोच्च न्यायालयत स्पे.लि.पी.नं.१०२९७/२०१९ हे सुध्दा फेटाळण्यात आले आहे.

वादीच्या लाभात लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन असल्यामुळे दावा मिळकतीचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. अर्जदार हिने वेगवेगळया नावाने बनावट पासपोर्ट बनवून फसवणूक केल्यामुळे तिच्या विरुध्द केस चालू आहे. तिच्या विरुध्द इंटरपोल रेड कॉर्नर नोटीस सुध्दा जारी करण्यात आली आहे. दावा मिळकत अर्जदार हिच्या ताबेकब्जात नव्हती व नाही. तसेच वादीने दाखल केलेल्या दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७/२०१४ मध्ये अर्जदार हिने दाखल केलेला दावा मिळकत कसू नये, त्यामध्ये बदल करु नये तसेच त्रयस्त इसमांचा हक्क निर्माण करु नये अशा स्वरुपाचा अर्ज फेटाळण्यात आला आहे. तसेच अर्जदार हिने दाखल केलेल्या आरटीएस अपील क्र.७३/२०१८ मधील आदेशाविरुध्द अप्पर जिल्हा अधिकारी यांच्याकडे अपील क्र.३२१/२०२२ प्रलंबित आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तूतचा अर्ज ५०/०००/- रुपये खर्चासह फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यास ना-हरकत दर्शवली आहे.

३. अर्जदार तर्फे विद्वान वकील श्रीमती पी. ए. केने आणि वादी तर्फे विद्वान वकील श्री पी. एच. वर्तक यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच निशाणी क्र.३८ कडील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. अर्जदार हिच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार ही मयत नरेंद्र उमराव उर्फ पेंटर यांची पत्नी असून तिच्या नावे वारस पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यामुळे ती आवश्यक पक्षकार आहे असा युक्तीवाद केला. तसेच ना. उच्च न्यायालय यांच्या लेटर ऑफ ॲमिनिस्ट्रेशन नुसार वादीला दावा मिळकतीची केवळ देखरेख करण्याचा अधिकार आहे. परंतू, वादी लेटर ऑफ ॲमिनिस्ट्रेशनचा गैरफायदा घेवून दावा मिळकत स्वतःच्या नावे हस्तांतरण करण्याच्या प्रयत्नात आहे. आरटीएस अपील क्र.७३/२०१८ मधील आदेशानुसार अर्जदार नरेंद्र उमराव उर्फ पेंटर यांची पत्नी व वारस असून फेरफार उता-यामध्ये तिचे नाव घेण्याबाबत आदेश झाला आहे. तसेच ना. सर्वोच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार अर्जदार हिच्या विरुध्द फौजदारी प्रक्रिया कलम ३४० बाबतच्या आदेशामध्ये बदल करण्यात आला असून अर्जदार हिच्या कडून ५०,०००/- रुपयाचा दंड आकारण्यात आलेला नाही.

४. निशाणी क्र.५० कडील वारस पंचनाम्याच्या प्रत, निशाणी क्र.५२ कडील यादीसोबत दाखल करण्यात आलेल्या आरटीएस अपील क्र. आणि निशाणी क्र.३६ कडील कागदपत्राच्या यादीसह दाखल करण्यात आलेल्या लेटर ऑफ ॲमिनिस्ट्रेशन, पिटीशन नं.२५१/२०१६, किरकोळ पिटीशन नं.१४/२०१७, अपील नं.४३८/२०१७ आणि स्पे.लि.पी.नं.१०२९७/२०१९ मधील न्यायनिर्णय यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार हिच्या नावे वारस पंचनामा करण्यात आला असला तरी वादीच्या लाभात ना. उच्च न्यायालय यांच्याद्वारे पिटीशन नं.२५१/२०१६ मध्ये लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मंजूर केले असून सदरचे लेटर ऑफ ॲमिनिस्ट्रेशन रद्द होण्याकरीता अर्जदार हिने किरकोळ पिटीशन नं.२४/२०१७ दाखल केले होते. सदरचे पिटीशन ना. उच्च न्यायालय मुंबई यांनी ५०,०००/- रुपये खर्चासह अर्जदार हिच्या विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३४० नुसार कारवाई करण्याचे निर्देश देवून फेटाळले आहे. त्यानंतर अर्जदार हिने ना. उच्च न्यायालय यांच्या डिव्हीजन बॅन्चकडे दाखल केलेले अपील नं.४३८/२०१७ आणि ना. सर्वोच्च न्यायालयत स्पे.लि.पी.नं.१०२९७/२०१९ हे सुध्दा फेटाळण्यात आले आहे. यावरुन वादीच्या लाभात दावा मिळकतीची देखरेख करण्याबाबत लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन असल्याचे स्पष्ट आहे.

५. याशिवाय अर्जदार हिच्या हक्कात मंजूर झालेल्या स्पे.मु.नं.५८/२०१२ मधील न्यायनिर्णय व हुकूमनामा दिवाणी चौकशी अर्ज क्र.३७/२०१४ मधील निशाणी क्र.५७ कडील आदेशानुसार स्थगित करण्यात आला आहे. याशिवाय अर्जदार हिने दाखल केलेल्या आरटीएस अपील क्र.७३/२०१८ मधील आदेशाविरुध्द अप्पर जिल्हा अधिकारी यांच्याकडे अपील क्र.३२१/२०२२ प्रलंबित असल्याबाबत वादीचे कथन आहे. प्रस्तूतचा दावा प्रतिवादी ग्रामस्थ सर्वे पंचकमिटी यांची दावा मिळकतीमध्ये वहिवाट नाही असे जाहिर करुन मिळण्यासाठी आणि निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे दाव्यातील वादाचे पुर्णपणे आणि प्रभावीपणे निराकरण होण्यासाठी अर्जदार ही आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार हिस प्रस्तूत दाव्यात समाविष्ट करणे

आवश्यक नाही या मतास मी पोहचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो.

## **आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १०/११/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड